## निशाणी नं. ६६ वरील आदेश

**१.** सदरचा अर्ज हा वारस रेकार्डवर घेण्या करीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. २ व ५ यांचे वारस रेकार्डवर घेण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**२.** प्रतिवादी क्र. २ कै. राम चिंतु म्हात्रे यांचा मृत्य ०६/०५/२०१७ रोजी झाला आहे. त्यांना २/१ इंदूमती राम म्हात्रे, २/२ दिपक राम म्हात्रे, २/३ अविनाश राम म्हात्रे, २/४ अवदूत राम म्हात्रे हे वारस असल्याचे नमुद केले आहे. तसेच प्रतिवादी क्र. ५ कै. बेबीबाई प. म्हात्रे हयांचा मृत्यु दि. ०१/११/२०१९ रोजी झाला आहे. त्यांना ५/१ धर्मेंद्र परशुराम म्हात्रे हे वारस आहे. या वारसा शिवाय मयत यांना कोणीही वारस नाही असे नमुद केले आहे. तसेच मयत वादीचे वारस रेकार्डवर आले नाहीत तर तांत्रिक त्रुटी राहिल असे नमुद केले आहे. व अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विंनती केली.

**३.** सदर अर्जाला प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज करून टेनेबल नाही तसेच वादीने वाटपाकरीता दावा दाखल केला आहे. वादी प्रतिवादी एकमेकांचे नातेवाईक आहे. त्यामुळे प्रतिवादीच्या वारसाबददले वादीला माहिती नाही हे कारण न पटणारे आहे त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

**४.** दाव्याचे सुंपर्ण निराकरण होण्यासाठी वादी यांना संधी देणे गरजेचे आहे. सबब मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी १४ दिवसांच्या आत प्रतिवादी क्र. २ व ५ यांचे वारस रेकार्डवर घ्यावेत व दाव्याची दुरुस्त प्रत दाखल करावी.

**(पी.एन.पठाडे)**

दिनांक : २५/१०/२०२१. दुसरे सह दि.न्यायाधीश,क.स्तर,उरण.